प्रकरण तिसरे

# 'वाटा पळवाटा' नाटक आणि आंतरजातीय विवाहाची समस्या


१. दत्ता भगत यांचे वाङ्मयीन कर्तृत्त्व

२. 'वाटा पळवाटा' नाटकातील आंतरजातीय विवाहाची समस्या

२.१ नाटकाचे कथानक

२.२ नाटकातील व्यक्तिरेखा

२.३ नाटकातील घटनाप्रसंग

२.४ नाटकातील संघर्ष

२.५ वाङ्मयीन मूल्यमापन

३. निष्कर्ष




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण तिसरे

## 'वाटा पळवाटा' नाटक आणि आतंरजातीय विवाहाची समस्या

'वाटा पळवाटा नाटक आणि आंतरजातीय विवाहाची समस्या' या प्रकरणात दलित रंगभूमीवरील वेगळे वळण देणाऱ्या प्रयत्न करणाऱ्या दत्ता भगत यांच्या 'वाटा पळवाटा' नाटकातील आतंरजातीय विवाहाच्या समस्येचा ऊहापोह करावयाचा आहे. 'वाटा पळवाटा' हे नाटक दलित असून आंबेडकरी प्रेरणेतून ह्या नाटकाची निर्मिती झाली.

१९६0 नंतरच्या दलित साहित्याचा उदय झाला. या साहित्य प्रवाहात कविता, कथा, आत्मकथा हे वाङ्मय प्रकार मोठ्या प्रमाणात निर्माण झाले असून त्यापैंकी दलित नाटक हा महत्त्वाचा वाङ्मय प्रकार आहे. दलित चळवळीचा एक भाग म्हणून या नाटकांकडे पाहिले पाहिजे. कारण दलित रंगभूमीला आंबेडकरी चळवळीतून प्रेरणा मिळाली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्येच 'युगयात्रा' (म.भि.चिटणीस) हे नाटक सादर झाले. डॉ.आंबेडकर यांनी १४ ऑक्टोंबर १९५६ ला जे धम्मचक्र प्रवर्तन केले त्या धम्मदीक्षा समारंभाच्या मंचावरच 'युगयात्रा' हे नाटक सादर केले गेले होते. पुढील काळात दलित नाटकाला या नाटकामुळे दिशा मिळाली व दलित नाटक्कारांची एक पिढीच उदयाला आली.

### १. दत्ता भगत यांचे वाङ्मयीन कर्तृत्व :

दलित रंगभूमीच्या चळवळीत दत्ता भगत यांचा सहभाग आणि योगदान लक्षणीय आहे. 'आवर्त', 'जहाज फुटलं आहे आणि इतर एकांकिका', 'खेळिया', 'अश्मक' व 'वाटा पळवाटा' या नाटकांना रंगभूमीवर विशेष स्थान आहे. याशिवाय त्यांची बौद्ध पूजा पाठविधी (संकीर्ण), होळी (कथा), कायापालट (कथा), दलित साहित्य : वाङ्मयीन प्रवाह (समीक्षा), नरहर कुरूंदकरांच्या लेखनाची सूची, निवडक एकांकिका, परिवर्तन : संकल्पना वेध आणि वास्तव (संपादन), विजयी विश्व तिरंगा प्यारा (स्फुट), निळी वाटचाल (समीक्षा), सभासदाची बखर (संपादन), तृतीय रत्न (संपादन), गोष्ट गोधराजाची (बालनाटिका), आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी असे लेखन प्रकाशित आहे.

### एकांकिका :

भगतांच्या अनुभवरूपाचे वेगळेपण त्यांच्या एकांकिकेमधूनच दिसून येते.

दलितांवर होणाऱ्या अन्यायामुळे खवळून उठणाऱ्या मानवी मनाला त्याचबरोबर सवर्णा कडून दलित स्त्रियांवर होणारा अन्याय याचेही चित्रण भगतांच्या एकांकिकेत येते. आतापर्यंत त्यांनी आठ एकांकिका लिहिल्या आहेत. त्याचा साक्षेपाने विचार खालील प्रमाणे,

'सूड' या एकांकिकेत मेघनाथ हा दलित कार्यकर्ता स्त्रीवर झालेल्या अन्यायाचा बदला घेतो. दलित सवर्णाच्यातील जातीयतेचा संघर्ष यामध्ये आहे. एका सूडाचा बदला दूसरा सूड घेवून घेतला आहे. आंबेडकरांच्या विचाराने स्वातंत्र्योत्तर भारतातील दलित जागा झाला. तो स्वत:च्या हक्कासाठी भांडू लागला, अन्यायाला प्रतिकार करू लागला. तो मुकाटयाने काही सहन करणार नाही. त्यालाही माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे त्याची जाणीव तो करून देवू लागला. हीच जाणीव या एकांकिकेच्या मुळाशी आहे.

'पराभव' या एकांकिकेत डॉ.अरगडे हे सरकारी नोकरी करतात. त्याचा मित्र अविनाश वाघमारे त्याच्या घरी येतो. त्यावेळी डॉ.अरगडे व मीना अरगडे याची जात ओळखतात. मीनाचा जातीवरून अपमान केला जातो. पण अडचणीच्या वेळी काकांना डॉ.अरगडे मदत करतात व काकांना आपला पराभव मान्य करावा लागतो. आजही जातिभेद पाळला जात आहे म्हणून जातियतेवर प्रहार करण्याचा प्रयत्न एकांकिकेत केला आहे. जातीमुळे येणारी पराभूतवृत्ती याचेही चित्रण येथे आहे. दोन पातळीवर वावरणारी ही एकांकिका आहे.

'आवर्त' या एकांकिकेत जातीच्या आवर्तात आजचा समाज कसा गुरफटला आहे. त्याचेच फल म्हणून दलितावर होणारा अन्याय हा विषय आहे. यात काही प्रमाणात पारंपरिक तमाशातील वगाचे आणि काही प्रमाणात नाटकाचे मिश्रण करून एकांकिका लिहिली आहे. ढोंगी समाज वारकऱ्याच्या रूपाने यामध्ये रंगविला आहे. पंरपरेच्या रक्षणासाठी हा समाज पाप करतो हे या एकांकिकेतून सांगितले आहे.

'चक्रव्यूह' यात दलित नाटयलेखक जयन्त निमाबरोबर आंतरजातीय विवाह करतो. पण निमाचे वडील तात्या यांनी जातीवाचक शब्द वापरला म्हणून त्यांना आपल्याकडे येण्यास मनाई करतो. मात्र आपल्या नाटकात मिळालेले पैसे चितळेना ब्राम्हण मुलांच्यासाठी खर्च करायचा नाही असे सांगतो. माणूस जातीच्या चक्रव्यूहात कसा गुरफटला जातो हा विचार येथे मांडला आहे. जातिभेद करू नका म्हणणारे कसे जातीबाहेर जात नाहीत या सामाजिक जाणिवेने एकांकिकेचे लेखन केलेले आहे.

'ठिणगी' मध्ये सुदाम हा दलित कार्यकर्ता आहे. दलितावर झालेला अन्याय त्याला सहन होत नाही. तो प्रतिकार करतो. नामांतराच्या दंगलीत दलितांची घरे जळतात यामध्ये खरे आरोपी पेशवे वकिल निर्दोष सोडतो. म्हणून त्याचा बदला घेण्याचा निर्णय सुदाम घेतो. यातूनच बदला घेण्यासाठी पेशव्यांच्या पत्नीवर हल्ला करतो. नामांतराच्या व जातियतेच्या राजकारणामुळे दलितांचे संसार उध्वस्त होत आहे याचे चित्रण ठिणगीत येते.

'एकटी' मध्ये विधवा मायची कन्या पारू हिच्या खांदयावर देशमूख नावाचा मुलगा हात टाकतो. त्यामुळे बौध्द व सवर्ण यांच्यात भांडण होते. पारूचे मांगाच्या मनोहरवर प्रेम असते. पण ते लग्न होत नाही. पारू ही बौद्ध मुलांना तुम्ही माझ्यासाठी भांडण केले नाही जातीसाठी भांडण केले आहे असे सांगून देशमुखला कॉलेजमधून काढण्यासाठी सही करत नाही. पारूचे हे जगणे म्हणजे एकाकी जीवन आहे. तिला जातीयता नको असते. ही जातीयता दलितामध्ये सुध्दा आहे. जातीयतेची ही पाळेमुळे किती खोलवर रूजली आहेत यातून एकटेपणाचे दु:ख कसे अनावर होते याचा प्रत्यय प्रस्तुत एकांकिकेत येतो.

'शोध' एकांकिकेत दलित युवक शिक्षणाने सुधारतो व समाजापासून कसा दूरावतो याचे चित्रण येते.

'वादळ' एकांकिकेत लपलेली नाती उघड झाली की माणसाला त्या नात्याची घृणा निर्माण होते. माणसे किती वासनेने बरबटलेली असतात. याचा विचार इथे आबा, जीजी, देवयानी व शेखर या व्यक्तिरेखेमधून मांडला आहे. दत्ता भगत केवळ दलित आणि जातीयता यावर लेखन करीत नाहीत तर माणूस, त्याचे जगणे, त्याच्यातील पशुत्व यावर देखील लेखन करून माणसाचा व्यापक पातळीवर विचार केला आहे.

'जहाज फुटले आहे' या एकांकिकेत सुशिक्षीत बेकार तरूणाची व्यथा मांडली आहे. तसेच आजची सदोष शिक्षणपध्दती स्पष्ट केली आहे. भगत हे केवळ दलितांचेच प्रश्न मांडत नाहीत तर एकूण मानवी पातळीवर त्यांचा विचार करतात म्हणूनच तरूणांची आजची व्यथा 'जहाज फुटलं आहे' च्या रूपाने बोलकी होते. समाजातील कृतिहिनता आणि केवळ उपदेश करण्याची प्रवृत्ती कशी बळावत चालली आहे याचे चित्रण मांडलेले आहे.

दत्ता भगत यांनी 'आवर्त आणि इतर एकांकिका' (१९७८), 'चक्रव्यूह आणि इतर एकांकिका' (१९८), 'जहाज फुटलं आहे आणि इतर एकांकिका' (१९८७) अशा एकांकिका लिहल्या आहेत. भगताच्या एकांकिका लोकनाटयांच्या अगांने जाणाऱ्या

असून भडक नाहीत कारण त्यातून व्यक्त होणारी जाणीव महत्त्वाची आहे. गूढ विजयाचे आकलन अगदी सोप्या पध्दतीने त्यांनी आपल्या एकांकिकेत व्यवस्था मोडण्याचा प्रयत्न केला आहे.

**नाटक :**

दत्ता भगत यांनी 'खेळिया' (१९८७) 'वाटा पळवाटा' (१९८८) 'अश्मक' (१९९३) अशी तीन नाटके लिहिली. या तीनही नाटकांना महाराष्ट्र शासनाकडून गौरविण्यात आले आहे.

'खेळीया' या दोन अंकी समस्या प्रधान नाटकात अनेक घटना आहेत. पण त्या रंगभूमीवर घडत नाहीत याचे कारण त्यांना घटनांमधील नाट्यापेक्षा घटनेत गुंतलेल्या व्यक्तींच्या मनातले क्रिया प्रतिक्रियांचे नाट्य अधिक महत्त्वाचे वाटते. मुळात 'खेळिया' हे नाटक दलित पॅथर्सच्या चळवळीने निर्माण केलेल्या उद्रेकाला अर्पण केले आहे. दलित पॅथर्सने दांभिक दलितेतरांना जसे दोषी ठरविले तसे स्वार्थी नेत्यांचे ही बुरखे फाडले त्यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या तरूण दलित युवकांनी आपल्या चळवळीचे पुनर्मुल्यांकन करावे ही प्रक्रिया पॅथर्सच्या उद्रेकामुळे निर्माण झाली हे दत्ता भगत विसरत नाहीत.

'वाटा पळवाटा' या नाटकात दत्ता भगत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजपरिवर्तनाने भारावलेल्या तीन पिढयाचे चित्रण केले आहे. त्यांना डॉ. आंबेडकरांची चळवळ पुढे न्यायची आहे. पण समाजाच्या गतिमान परिवर्तनामुळे हे कार्यकर्ते अपयशी ठरले आहेत. तर या कार्यकर्त्यामध्ये काळानुरूप अंतर पडून अंतर्गत ताणतणाव निर्माण झाले आहेत. याचे चित्रण त्यांनी नाटकात केले आहे. याशिवाय दलित दलितेत्तर संघर्ष व आंतरजातीय विवाहाचे चित्रणही या नाटकातून करतात याचे विवेचन पुढे येणारच आहे.

'अश्मक' या नाटकात दत्ता भगत यांनी सत्तेचा मोह आणि मानवी कल्याणासाठी अथक परिश्रम घेणारी करूणामय प्रज्ञा ह्यातील संघर्ष हा मानवी इतिहासातील एक चिरंतन संघर्ष आहे हा संदेश पोहचवला आहे. त्यांनी हे नाटक लिहिताना आपल्या देशात लागू झालेली आणीबाणी व त्यानंतरची जनता राजवट, त्या राजवटीचे कोसळणे व नामांतरानंतर देशात झालेली दंगल या गोष्टींना समोर ठेवले आहे. परंतु या नाटकासाठी यांनी केलेला पौराणिक परिभाषेचा वापर हा खटकणारा आहे.

याशिवाय दत्ता भगत यांनी 'होळी' 'कायापलट' हे कथासंग्रह लिहले आहेत. त्याच्या 'दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर' (१९९२), 'दलित साहित्य :

प्रवाहाचा अभ्यास' या दलित साहित्यविषयक पुस्तकातून दलित साहित्याकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन तटस्थ पण वाङ्मयीन मूल्यांचा आग्रह धरणारा असा जाणवतो. त्यामुळे दलित साहित्याच्या दोषांचीही मार्मिक चिकित्सा ते करतात. साहित्याने प्रचाराची किंवा राजकीय सामाजिक प्रश्न सोडवण्याची भूमिका घेवू नये अनुभवाच्या व्यापकतेवरून तसेच त्यांच्या उंचीवरून त्या साहित्याचे मोल ठरविले पाहिजे अशी त्यांची वैचारिक भूमिका असल्याने त्यांच्या समीक्षेप्रमाणे त्यांची नाटके वेगळी ठरतात. त्यांनी दलित रंगभूमीचे सामर्थ्य व र्मयादांचाही ताळा मांडलेला आहे. गंभीर व विचारप्रवर्तक लेखक म्हणून त्यांची निर्मिती व समीक्षा ही दोन्ही त्यांचे वेगळे व महत्त्वपूर्ण स्थान स्पष्ट करतात त्यांचे संशोधनपर लेखही अनेक नियतकालिकांतून प्रसिध्द झाले आहेत.

दलित समाज आणि दलित साहित्य यांचा अन्योन्य संबंध आहे. दलितांच्या वाट्याला जे जीवन आले त्या जीवनाचे प्रतिबिंब दलित साहित्यात आहे. साहजिकच दलित साहित्याने सवर्ण समाजाच्या व्यवस्थेला नकार दिला आहे. सवर्णाच्या अन्यायामुळे त्यांच्या साहित्यात वेदना येते. त्याचबरोबर वेदनेबद्दलचा विद्रोह आणि नकार हे दलित साहित्याचे वैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्यांचा प्रभाव दत्ता भगत यांच्या साहित्यावर दिसून येतो.

भगत यांनी केवळ दलित आणि सवर्ण यांच्यातील संघर्ष रेखाटला नाही तर दलितांमधील श्रेष्ठ कनिष्ठतेची पातळी यांचेही चित्रण त्यांच्या एकांकिकेमधून दिसते.

मानावी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न दत्ता भगत करताना दिसतात. त्यांच्या एकांकिका, नाटक बऱ्याचदा जातीभोवतीच फिरताना दिसतात. प्रत्येक प्रश्नाचा मुळातून शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. एकांकिकेतील, नाटकातील पात्राच्या माध्यामातून बऱ्याचदा भगत बोलताना दिसतात. ते पात्राना स्वातंत्र्य देत नाहीत.

दत्ता भगत आपल्या नाट्यलेखनात प्रश्न निर्माण करून प्रेक्षकांनाच अतंर्मुख होवून विचार करायला लावतात. ते शब्दबंबाळात अडकून न पडता सोप्या आणि साहित्यमूल्य असलेल्या लिखाणाचा पाटपुरावा करतात.

प्रेम आणि आंतरजातीय विवाह यामधून ते ब्राम्हण आणि दलित संघर्ष रेखाटतात. जात माणसाच्या रक्तात किती भिनली आहे, तिचे मुळातून उच्चाटन कसे आवश्यक आहे या दृष्टीने त्याच्या एकांकिका व नाटक साकारतात. असाच प्रयत्न त्यांनी 'वाटा पळवाटा' नाटकात दलित चळवळीतील कार्यकर्त्यांचा वैचारिक संघर्ष व आंतरजातीय विवाहाने होणारा मानसिक संघर्ष या चित्रणाव्दारे त्यांनी केला आहे. 'वाटा पळवाटा नाटक आणि आंतरजातीय विवाहाची समस्या' याचे विवेचन करताना नाटकाचे

घटक कथानक, व्यक्तिरेखा, घटनाप्रसंग, संघर्ष व वाङ्मयीन मूल्यमापन याची सामाजिक व वाङ्मयीन चिकित्सा करून निष्कर्ष काढले आहेत.

## २. 'पाटा पळपाटा' नाटकातील आंतरजातीय विवाहाची समस्या :

### २.१ नाटकाचे कथानक :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या तीन पिढ्यांचे चित्रण दत्ता भगत यांनी या नाटकात केले आहे. या तीन पिढ्यांतील असणारे अंतर फार गुंतागुंतीचे आहे. पहिली पिढी इंग्रजांच्या राजवटीतील अशिक्षित असून एखाद्या प्रश्नाची सखोल चर्चा करावी एवढी उसंत नसणारी तसेच एवढा बौध्दिक अवाका नसणारी आहे. परंतु प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांची आहे.दूसरी पिढी सुशिक्षित, थोडे आर्थिक स्थैर्य लाभलेली असून त्या पिढीच्या सभोवतालचे वातावरण ध्येयवादाने भारावलेले असले तरी काहीसे धुसर झालेले दिसते. तिसरी पिढी स्वातंत्र्योत्तर काळातील परिवर्तनाची गती आणि अपेक्षा यातील व्यस्त प्रमाणामुळे संतापलेली धाडसी परंतु लोकशाहीवरचा विश्वास गमावून बसलेली या तीन पिढयांचे चित्रण या नाटकात केलेले आहे.

पुरग्रस्तांची घरे दलितांना मिळवून देण्यासाठी या तीन पिढ्या एकत्र आल्या आहेत आणि त्यातून या पिढ्यांमध्ये घडून आलेला संघर्ष या नाटकात कलात्मकतेने रंगविला आहे. तसेच ब्राह्मण मुलगी आणि बौध्द मुलगा यांच्या वैवाहिक जीवनाचे समजुतदार प्रेमाचे त्याच्या सुखी संसाराचे चित्र येथे रेखाटले आहे.

सतीश गोडघाटे ही या नाटकातील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. त्याचा हेमा या ब्राह्मण मुलीशी विवाह झालेला असतो. सतीश हा प्राध्यापक व दलित कार्यकर्ता असतो. युक्रांदच्या चळवळीमुळे हेमा व सतीश एकत्र येतात व पुढे विवाहबध्द होतात. काका हे सतीशचे चुलते त्यांनीच त्याचा संभाळ केलेला असतो.

काका हे ध्येयवादी असून सतीशचा विवाह त्यांना पसंत नसतो ते तसे बोलूनही दाखवतात पण विरोध करीत नाहीत. विवाहानंतर काका, सतीश व हेमा तिघे सुखाने राहतात. मात्र काकातील आंबेडकरी ध्येयवाद आणि सतीश हेमातील व्यवहारिकता संघर्षाला कारणीभूत ठरते. अशी ही पहिली पिढी दत्ता भगत यांनी चितारली आहे.

अर्जुन हा सतीशचा विद्यार्थी, पुरग्रस्तांची घरे दलितांना मिळावित म्हणून त्यांने संघर्ष सुरू केलेला असतो त्यात तो यशस्वी होतो. पण सतीश हा शिकलेला

असल्यामुळे तो अविचारी, अतिरेकी भूमिकेने वागत नाही. उलट तो अर्जुनलाच रोखण्याचा प्रयत्न करतो.

अर्जुनच्या विचारात विद्रोह, वेदना, नकार असतो. त्या विद्रोहामुळेच तो संघर्षाला तयार होतो. दैनंदिन जीवनातील संघर्षामुळे वेदनेमुळे तो आपल्या प्रेमाला तिलांजली देतो जेव्हा तो मोर्चा काढतो तेव्हा मिलिंदनगरमध्ये गोळीबार होतो. शेवन्ता ही गोळीबारात मृत्युमुखी पडते आणि पोलिस अर्जुनलाच अटक करतात त्याच्यावर खुनाचा आरोप ठेवतात.

अर्जुनला कॉलेजमधून काढण्यासाठी प्राचार्यांच्या संगनमताने प्रयत्न होतात. पण त्याला सतीश विरोध करतो एवढे झाले तरी अर्जुनला अटक होते तेव्हा अर्जुनला, "चळवळीत उतरायचं तर किंमत मोजावी लागते."(पृ.क्र.७५) हे अर्जुनचे विधान सतीशच्या वर्मी लागते व तो अर्जुनला जामीन देण्याचा प्रयत्न करतो इथे हे नाटक संपते.

## २.२ नाटकातील व्यक्तिरेखा :

'वाटा पळवाटा' या नाटकात काका, सतीश, अर्जुन, हेमा, दासराव , सोनल अशा व्यक्तिरेखा आहेत.

**काका :**

काका हे आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या पहिल्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. ही ब्रिटीश राजवटीतील पिढी आहे. काका दासराव गुरूजी जे ब्राह्मण आहेत त्यांना म्हणतात "धरम काय कोणाला चुकलाय गुरूजी? तुम्हीच सांगा हिला आन आमच्या सत्तेवानला सांगा. मानू नका देव, स्टेजवर बोला की काही बी पन विहार बांधायचा म्हंजे कस धावून आलं फाइजे. जावू द्या म्या काय गप्प बसायचा न्हाई गुरूजी. जाईल तिथ काय ना काय करीलच. बाबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून लढलोय गुरूजी आम्ही त्याच्यावानी बुक वाचून बाबासाहेब न्हाई कळत आम्हाला."(पृ.क्र.१२) काकांचा धर्माभिमान यातून दिसून येतो.

काका कडवे नाहीत. ते हेमाला समजून घेतात. सुरवातीला तिच्या जातीचा उच्चार सारखा करतात पण हेमा त्यांना समजावून सांगते आणि हळूहळू काका हेमाच्या विचाराशी सहमत होत जातात. हेमा काकांना म्हणते, "काका मला तुमची वेदना कळत नाही अस वाटत का तुम्हाला? सून आहे मी तुमची" (पृ.क्र.६) तेव्हा, "ह्या असच कधीमधी गोड बोलतीस अन् माझा राग पार इरून जातो." (पृ.क्र.७) अशी कबुली काका देतात. हेमाचा नितळ स्वभाव तिचे सतीशवरचे प्रेम, तिने घेतलेली त्याची

काळजी त्यामुळे काकांना ती आपली वाटते. माणसाला जात असते पण या जातीचा पराभव करणारी माणूसकीही माणसात असते. याचा प्रत्यय काकांना हेमाच्या सहवासात येतो.

काका हेमाला सतत जातीवाचक बोलतात. आमच्यातली एखादी पोरगी सतीशने केली असती तर सुखाने चार घास खाल्ले असते. हा साधा सामाजिक व्यवहार काकांच्या व्यक्तिरेखेत आहे. याबाबत दत्ता भगत यांचा दृष्टीकोन स्पष्ट करताना प्रा.शैलेश त्रिभुवन यांनी म्हटले आहे की, "आंतरजातीय विवाहातून जातीजाती मधील अंतर कमी होऊन जातीयता नष्ट होऊ शकते. हा आशावाद सतीश व हेमाच्या माध्यमातून दत्ता भगत व्यक्त करतात पण हा प्रवास केवळ एकतर्फी असल्यामुळे सनातनी सवर्ण प्रवृत्तीचाच पुन्हा फायदा होतो आहे हे काकांकडून दत्ता भगत वदवून घेतात."[१] यावरूनच दत्ता भगत यांनी स्वातंत्र्योत्तर काळात दलित तरूणाने शिक्षण घेवून सवलतीतून नोकऱ्या मिळवल्या आणि या दुसऱ्या पिढीने चळवळीच्या निमित्ताने केवळ सवर्ण मुलींचा स्वीकार करून आपल्याच समाजातील मुलींचे नुकसान केले हे दत्ता भगत काकाकडून नाटकभर वेळोवेळी वदवून घेतात.

काका सतीशला अर्जुनप्रमाणे आक्रमक नाही म्हणून दोष देतात. ते कायम अर्जुनची बाजु घेतात मात्र शेवन्ता सारख्या विधवेकडून तो हप्ता मागतो आणि ती देत नाही म्हणून तिला घराबाहेर काढतो. या प्रसंगाने ती दंगलीत सापडते व मरण पावते. तेव्हा काका अर्जुनला दोष देतात. दादासाहेब गायकवाड सत्तेमागेच गेले, भंडारे, रूपवते गेले याचे विलक्षण दु:ख त्यांना होते आणि ही नवी पोरंही तिथच निघाली याची खंत काकांना जाळते. मंत्र्याकडून दलितांना भांडी पैसे मिळवून देण्याचा कार्यक्रम करणाऱ्या अर्जुनला बुध्द मुर्तीला काका हात लावू देत नाहीत. यावेळीच त्यांचा मृत्यू होतो. चळवळीची झालेली पडझड आणि दूसऱ्या, तिसऱ्या पिढीचा भरकटलेपणा यातून आपल्या समाजाची होणारी स्थिती पाहुन त्यांना दु:ख होते हे यातून दिसून येते.

**सतीश :**

प्रा.सतीश गोडघाटे ही या नाटकातील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. सतीश शिक्षण आणि आर्थिक स्थैर्य लाभल्यामुळे आपल्या संबंधीच्या प्रश्नाचा गंभीर विचार करतो आहे. तसेच लोकशाही शासन व्यवस्थेवर त्याचा विश्वास आहे.

सतीश सुरूवातीपासूनच युक्रांदसारख्या चळवळीत काम करणारा कार्यकर्ता आहे. या चळवळीतून त्याने हेमा नावाच्या ब्राह्मण मुलीशी आंतरजातीय विवाह केला आहे. यातून तो सवर्ण दलित संघर्ष संपवू पाहतो आहे.

सतीश सत्यानं वागणारा आहे म्हणूनच काका त्याला 'सत्तेवान' म्हणतात. सतीश शेवन्तासाठी शाळेत नोकरी केल्याच्या अनुभवाचं खोटं प्रमाणपत्र आणून देत नाही पण हेच काम दासराव गुरूजी काकांसाठी करतात. काका तिची तात्पुरती सोय म्हणून हे काम करताना दिसतात. तेव्हा सतीश दासराव गुरूजींना उद्देशुन म्हणतो, "तुम्ही शेवन्ताच्या पोट पाण्याची सोय पाहिलीत. रागऊ नका गुरूजी, सोय पाहण्यामुळे होतो तात्पुरता लाभ पण त्यासाठी दर पावलागणिक किती मोठी किंमत मोजावी लागते. हे तुम्हाला नाही कळायच." (पृ.क्र.१८) यावरून सतीशचा प्रामाणिकपणा व दूरदृष्टी सिद्ध करण्यात दत्ता भगत यशस्वी झाले आहेत.

सतीशने अर्जुनला पुरग्रस्तासाठी बांधलेला घराचा जबरदस्तीने घेतलेला ताबा मान्य नाही. अर्जुनच्या या बेदरकार, बेजबाबदार वागण्याचा त्याला धोका आहे शिवाय दलितांच्या चळवळीला अधिक धोका आहे. अर्जुनच्या या वागण्याने गरजु दलितांना सगळ्यांच्या सहानुभूतीला पारखं व्हावं लागेल याची जाणीव सतीशला होती. सतीशला अर्जुन राजकारणी लोकांच्या हातचं बाहूलं होईल आणि दलित संघटनेच्या चिंध्या होतील अशी भीती होती. यावरून सतीशचा विचारीपणा व दलित संघटनेची त्याला असणारी चिंता स्पष्ट होते. सतीशचा अर्जुनच्या पिढीशी होणारा संघर्ष त्याच्यातील वैचारिक भिन्नता दत्ता भगत यांनी स्पष्ट केली आहे.

पुरग्रस्त गरीब व दलित गरीब हे दोन्ही गरीब एकमेकांविरूध्द झुंजताहेत व तेही कायदा हातात घेऊन हे मोठं संकट आहे असे सतीशला वाटते. कायदा जुमानायला तयार नसणाऱ्या अर्जुनला सतीश परोपरीनं समजावताना दिसतो तो म्हणतो "संख्येच्या बळावर होते ती न्यायाची लढाई नसते. तिथं सुरू होत असते ती झुंडशाही आणि झुंडशाहीत बळी पडतो तो गरीब माणूस" (पृ.क्र.३७) येथे सतीश हा केवळ दलितांचा विचार करताना दिसत नाही तर तो सर्व गरीब लोकांचा विचार करताना दिसतो तर काका व अर्जुन हे फक्त दलित लोकांचा विचार करतात त्यामुळे सतीश, काका व अर्जुन यांच्यात संघर्ष निर्माण होताना दिसतो.

अर्जुनचे घराच्या प्रकरणासाठी शेवंताकडे वर्गणी मागणे, शेवंताला घरातून बाहेर काढणे व दंगलीत झालेल्या गोळीबारात शेवंताच्या मृत्यू याचा आरोप अर्जुनवर येतो. अर्जुनला महाविद्यालयातून काढण्यासाठी प्राचार्यांच्या संगनमताने प्रयत्न होतात पण सतीश त्याला विरोध करतो. एवढे झाले तरी अर्जुनला अटक होते. "चळवळीत उतरायचं तर किंमत मोजावी लागते"(पृ.७५) या अर्जुनच्या विधानाने सतीश गलबलून निघतो व आपण शिकून सवरून फक्त वांझ विचारच करत राहिलो व या व्यवस्थेत

निरूपयोगी ठरलो असे सतीशला वाटते. याबाबत "दत्ता भगत यांची नाटके : संहितावलोकन आणि अन्वयार्थ" या लेखात प्रा.महेंद्र भवरे म्हणतात "सतीशच्या निमित्ताने दलित मध्यमवर्गाची झालेली गोची आणि निष्क्रीयता स्पष्ट झाली आहे. मात्र एवढेच स्पष्ट करणे हा या नाटकाचा हेतू नाही. अवतीभोवतीच्या सामाजिक पर्यावरणात बुध्दीवंताची झालेली अगतिक अवस्था याचेही दर्शन नाटककाराने घडविले आहे. बुध्दिवंत विचार प्रसवू शकतात; पण कृतिशील होऊ शकत नाहीत."[२] म्हणजेच शिक्षणाने दलित तरूण केवळ विचार करतो तर कृतिशील होऊ शकत नाही.ही निष्क्रीयता समाजाच्या दृष्टीने आदरास पात्र ठरणार नाही. अशी दलित शिक्षणाची अवस्था सतीशच्या निमित्ताने दत्ता भगत प्रकट करतात. सतीश अर्जुनला जामीन देण्याच्या प्रयत्नात लागतो इथे सतीशचा स्वत:शी चाललेला संघर्ष दत्ता भगत यांनी अचूक टिपला आहे.

असा हा सतीश कधी कधी दासरावांची फिरकी घेताना दिसतो तो म्हणतो, "विचार करण्याची पात्रता फक्त ब्राम्हणातच असते काय गुरूजी! चहा घ्या हेमाच्या हातचा आहे. काका म्हणतात तेच खरं लोक काही जात विसरत नाहीत." (पृ.क्र.४४) यावरून सतीश दासरावांच्या दुटप्पी वागणूकीवर ताशेरे ओढतो. मात्र हे सर्व जाणूनही तो दासरावांचा व्देष करत नाही.

सतीशला कधी त्याचा जुना मित्र कवी विजय कुंडकर आठवतो जो आपल्या आडनावापुढे कंसात 'पाटील' लिहितो. त्यामुळे कुंडकरला आता त्याच्या कवितेने मिळणाऱ्या प्रतिष्ठेवरोबर जन्मानं मिळणारी प्रतिष्ठा हवी आहे. त्यामुळे सतीशला जगण्याच्या लढाईत आपण कुचकामी ठरत आहोत व जातींना महत्त्व मिळत आहे याची जाणीव होते.

समजूतदार, विचारी, दूरदृष्टी असणारा तसेच स्वत:च्या वांझ विचाराने निष्क्रीय झालेला शिवाय उच्चशिक्षित प्राध्यापक असून पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारा अंधश्रध्दाळू सतीशची व्यक्तिरेखा दत्ता भगत यांनी रेखाटली आहे.

**अर्जुन**:

अर्जुन हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या तिसऱ्या पिढीचा बंडखोर प्रतिनिधी आहे. स्वातंञ्य मिळाल्यामुळे लोकशाही जीवनपध्दतीने समाजाचे परिवर्तन गतीने होत आहे. परंतु परिवर्तनात दलित समाजाच्या अपेक्षा पूर्ण न होता त्यांना त्यातून डावललं जात आहे. त्यामुळे ही पिढी संतापलेली आणि हक्कांसाठी आक्रमक झाली आहे.

अर्जुन हा प्रा.सतीश गोडघाटेचा विद्यार्थी आहे.शिवाय दलित चळवळीतील बंडखोर कार्यकर्ता आहे.तो पुरग्रस्तांची घरे दलितांना देतो याचे समर्थन करताना सतीशला म्हणतो, " सगळ्यांचा विचार करायचा मी गुत्तं घेतल नाही. मला नाही करायचा सगळयांचा विचार. मी माझ्याच जातीपुरतं पाहणार बस्स!" (पृ.क्र.२३) यावरून अर्जुन हा केवळ दलितांचा विचार करतो हे स्पष्ट होते.

अर्जुन आपण संघर्षाचा मार्ग का निवडला हे सांगताना म्हणतो, "सुधारकीपणाचा आव आणणाऱ्यांच्या छाताडावर नाचायचंय मला. आमच्या जातीच्या नावावर भाड खाणाऱ्यांचे बुरखे फाडायचेत, मी माझा मार्ग निवडलाय सर." (पृ.क्र.२३) यावरून अर्जुन हा विद्रोही आहे हे स्पष्ट होते. त्याच्यातील संताप, क्रोध त्याच्या वाक्यातून व्यक्त होतो. दत्ता भगत यांनी तो विद्रोह प्रखर भाषेत व्यक्त केला आहे.

दासराव गुरूजींची मुलगी सोनल हिच्या प्रकरणात गुरूजी अर्जुनला वाट्टेल तसे बोलतात त्याचा अपमान करतात त्या रागाच्या भरात अर्जुन स्वत:च्या दलित, दरिद्री असल्याबद्दल त्वेषाने बोलताना दिसतो.तो म्हणतो,"झोपडीत राहतो म्हणून मी निर्लज्ज? पोरका आहे म्हणून गुंड? दरिद्री म्हणून वाह्यात? लाथेने उडवतो मी असल्या इज्जतदारांना थुंकतो अशांच्या श्रीमंतीवर!"(पृ.क्र.३३) यातून दत्ता भगत अर्जुनचा विद्रोह स्पष्ट करतात. ब्राह्मणाबद्दलचा त्याचा व्देष प्रखर आहे "बामण साला, ही बामणाची जात, पोटातला कावा अखेर कधी कोणाला कळू द्यायची नाही हेच खरं!" (पृ.क्र.३४) अर्जुनची ही ब्राह्मणांबद्दलची प्रतिक्रिया त्याच्या स्वभावाचे चित्रण करणारी आहे.

अर्जुन केवळ दलितांचा विचार करतो. पुरग्रस्तांची घरे दलितांना मिळावी म्हणून प्रयत्न करतो. मोर्चा काढतो त्यातच दंगा होवून दलित वस्ती पेटवली जाते अर्जुननेच हा प्रसंग दलित, अडाणी लोकांवर आणला म्हणून सतीश अर्जुनला दोष देतो. तेव्हा अर्जुन संतापून म्हणतो, "त्याचं ते त्याचं आणि आमचं तेही त्याचंच? मग आमचं काय आहे सर इथं? काय आहे? आमची स्वत:ची एकच गोष्ट आहे सर, वेदना! अत्याचार आणि अन्याय त्याच्या ओझ्याखाली आम्ही नष्ट, नामशेष व्हायची पाळी आली तरी आम्हीच विचार करायचा? जमणार नाही सर! हा संघर्ष नाही ही चळवळ नाही हे युध्द आहे सर. महायुध्दापेक्षा मोठं!"(पृ.क्र.४९) अर्जुनचा हा संताप वर्षानुवर्षे अन्यायाखाली पिचलेल्या माणसाने प्रचलित समाजव्यवस्थेला दिलेला नकार दर्शवतो दत्ता भगत यांनी अर्जुनच्या ह्या वाक्यातून वर्षानुवर्षे अन्याय सहन करणाऱ्या माणसाची

प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

अर्जुन हा अत्यंत निग्रही आहे. चळवळीसाठी सर्वस्व अर्पण करण्याची त्याची मनोवृत्ती आहे. चळवळीसाठी सोनल या ब्राह्मण कन्येच्या प्रेमालासुध्दा अर्जुन नकार देतो मात्र सोनल जेव्हा दंगलीत सापडते तेव्हा अर्जुन तिला सुरक्षित घरी पोहचवून माणूसकीचा प्रत्यय देतो. दत्ता भगत यांनी असा या दलित चळवळीचा कार्यकर्ता उभा केला आहे, जो स्पष्टपणे संघर्षाशिवाय चळवळीला पर्याय नाही असे म्हणतो. ब्राह्मण प्रवृत्तीवर ताशेरी ओढणारी त्याची करारी मनोवृत्ती समर्थपणे उभी करण्यात भगत यशस्वी झाले आहेत.

**हेमा :**

हेमा ही सवर्ण हिंदू ब्राह्मण व जिल्ह्याचे सेशन जज्ज विष्णूपंत रानडे यांची कन्या आहे. विष्णुपंत रानडे हे ब्राह्मण असले तरी सुधारणावादी विचारसरणीचे आहेत.

हेमाने सतीश बरोबर आंतरजातीय विवाह केला आहे. त्यामुळे तिला अनेक अडचणीना सामोरे जावे लागते. सतीशच्या काकांचा या विवाहाला कितीही विरोध असला तरी काकांच्या फटकळ स्वभावाला समजून घेते व त्यांच्याशी आपलेपणाने व प्रेमाने वागते यातून ती प्रेमळ आहे हे जाणवायला वेळ लागत नाही.

दासरावाची मुलगी सोनल हेमाकडे मनावरील ओझे कमी करण्यासाठी येते. सोनल अर्जुनवर प्रेम असल्याचे कबुल करते. हेमा व सतीश यांचा आंतरजातीय विवाह असल्यामुळे ते आपल्याला मदत करतील या हेतूनेच सोनल हेमाकडे आलेली दिसते. यातून हेमाकडे सोनलचा बघण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. सोनलला हेमा सुखी दिसते पण त्यामागे तिने सहन केलेला विरोध, केलेला संघर्ष तिला दिसत नाही. म्हणून हेमा दासरावांना म्हणते, "आम्ही म्हणजे काय आंतरजातीय विवाह जुळवून देणाऱ्या केंद्राचे संचालक वाटलो?" (पृ.क्र.४६) दासराव गुरूजींनी ही हेमाला वाड्यात राहायला जागा दिली नाही शिवाय घेतलेले डिपॉझिट कारण सांगून परत केले. यावरून हेमाला ब्राह्मण वाड्यात जागा नाही हे स्पष्ट होते पण काकाही हेमाला पूर्णत: स्वीकारताना दिसत नाहीत.

हेमा आपला जातीयतेबद्दलचा संताप व्यक्त करताना म्हणते, "सोनलला वाटतं मी आधार द्यावा तिला. कारण मी आंतरजातीय विवाह केलाय ना. आणि अर्जुन! एवढा घरादारात वावरणारा पोरगा. पण संतापाच्या भरात फाडफाड बोलला. महार म्हटलं तर शिवी ठरते आणि बामण म्हटल तर? तर काय तो माझा गौरव होतो? जात मोडून

विवाह केलय मी समजून उमजून ती शिवीच आहे माझ्यासाठी माझी विटंबना करणारी. जो तो आपआपल्या जातीच्या क्रुर नख्यांनी ओरबाडतो मला. कधी सावधपणे तर कधी बेसावधपणे हेतू कोणताही असेल पण प्रत्येक घाव एकेक जखम करतो मला.आहे कोणाला ह्याची पर्वा? वाटतंय कुणाला आपली चुक झाली असं? जे वास्तव मी डोळ्यानं स्वीकारलय ते सहन करण्याचं बळ माझं मलाच मिळवावं लागेल. सतीश माझ्या दुबळया क्षणी तु फक्त सावरून घे मला. तु फक्त सावरून घे."(पृ.क्र.४८) यावरून हेमाची या जातीयतेत होणारी तडफड लक्षात येते. तिला ब्राह्मण स्वीकारू शकत नाहीत व बौध्दही पुर्णत: स्वीकारत नाहीत. तिच्या जातीचा उल्लेख पदोपदी करून तिच्या मनावर घाव केले जातात. दत्ता भगत यांनी ही हेमाची व्यक्तिरेखा सोशिक, समजुतदार अशी उभी केली आहे. हेमाला तिचं ब्राह्मण असणं दलितातही व ब्राह्मणांच्यातही सहन करावं लागतं. अशा वेळी सतीश तिला आधार देतो. हेमा व सतीश एकमेकांना आधार देत जगताना दिसतात.

हेमा ही काका, सतीश, अर्जुन यांच्या संघर्षात सतीशला सावरताना दिसते. अर्जुनला पोलिसापासून वाचवते. काकांनी आणलेल्या बुध्दमुर्तीची पूजा मनोभावे करताना दिसते. सोनलला समजून घेते. वेळ प्रसंगी जातीयवादावर चिडताना, संताप व्यक्त करताना दिसते पण त्यामुळे संसारात संघर्ष निर्माण होवू देत नाही.

**दासराव :**

दासराव हे सवर्णामधील सनातन प्रवृत्तीचा एक शिक्षक आहेत. ते स्वातंत्र्यसैनिक होते. सतीशबरोबर महाविद्यालयात शिक्षक आहेत. शिवाय हेमा ब्राह्मण म्हणून सतीश गोडघाटेच्या घरी येणे जाणे असते.

दासराव गुरूजी वागताना लबाडीने वागताहेत. त्यांच्या वागण्यातील कावा त्याच्या हेमाच्या हातचा चहा पिण्यावरून येतो. हेमा ब्राह्मण म्हणून ते तिच्या हातचा चहा पितात व सतीशला अर्धे ब्राह्मण समजतात.

दासराव गुरूजी आपल्या जबाबदारीचा विचार अधिक करतात म्हणून आपली मुलगी सोनल हिचा विवाह अरविंद देशमुखशी ठरवतात तो ही सोनलचा विचार न करता, यावरून गुरूजींचा स्वभाव लक्षात येतो. त्याचे वागणे व विचार करणे स्वत:पुरते मर्यादित आहे. काका दासरावांना 'इव्हाई' म्हणतात तेव्हा दासराव खोचकपणे नातं जोडलच.तरी तुमच्या तेहत्तीस टक्क्यात जागा देणार नाही तुम्ही म्हणून धुर्तपणे उत्तर देतात.

दासराव गुरूजींच्या वागण्यातील दुटप्पीपणा प्रखरपणे जाणवतो तो हेमा व सतीश यांच्याशी वागताना. एकिकडे दासराव गुरूजी हेमाला आपली मुलगी मानतात तर दुसरीकडे तिला राहण्यासाठी वाड्यात जागा देत नाहीत, वर अर्जुन जवळ बोलतात, "त्यांन कुठून बाई आणली कोणास ठाऊक आणि इथं येऊन मारे तोंडवर करून म्हणतो माझी बायको बामण!" (पृ.क्र.३४) यावरून दासराव गुरूजींची व्यक्तिरेखा स्पष्ट होते.

दासराव गुरूजीबद्दल आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना अर्जुन म्हणतो, "किती सडलेला मेंदू आहे डोक्यात बामण साला. ही बामणाची जात पोटातला कावा अखेर कधी कोणाला कळू द्यायची नाही हेच खरे." (पृ.क्र.३४) अर्जुनच्या माध्यमातून दत्ता भगत यांनी ब्राह्मणी प्रवृत्तीवर ताशेरे ओढले आहेत.

दासरावांना मुलगी सोनल दंगलीत सापडल्यावर तीची काळजी वाटत नाही तर स्वत:च्या इज्जतीची काळजी वाटते. असे हे दासराव गुरूजी स्वत: पुरता विचार करणारे. वरवर सुधारकीपणा आणि आतून मात्र परंपरागत विचार जपणारे व जगणारे अशी ही व्यक्तिरेखा त्यांच्या अंगभूत प्रवृत्तीसह दत्ता भगत यांनी चित्रित केली आहे. यातून त्यांनी ब्राम्हणी प्रवृत्तीचे चित्रण स्पष्टपणे केले आहे.

**सोनल :**

सोनल ही दासराव गुरूजींची मुलगी नाटकात थोड्याच काळासाठी येते पण मनाला चटका लावून जाते. तिचे अर्जुनवर प्रेम असते ते दासराव गुरूजींना कळावे म्हणून सोनल स्वत:च अर्जुनला पत्र लिहून ते पुस्तकात ठेवते. ते पुस्तक गुरूजींच्या हाती लागेल असे टेबलावर ठेवते दासराव पत्र वाचतात पण सोनलला काही न बोलता अर्जुनचा अपमान करतात. सोनल व अर्जुन यांच्यात त्यामुळे गैरसमज निर्माण होतो.

सोनल आपले वडील सुधारक विचारांचे आहेत त्यामुळे ते आपल्याला विरोध करणार नाहीत अशी आशा बाळगून हेमाकडे आधार मिळेल म्हणून येते. पण हेमा तिला हे इथंच थांबलं पाहिजे असं बजावते. इथपर्यंत सोनलचे अर्जुनवरचे प्रेम व त्यासाठी तिची चाललेली धडपड दिसून येते.

सोनल शेवटी अरविंद देशमुखशी लग्न करण्यास तयार होते. सोनल शेवटी हिंदू पारंपरिक प्रवृत्तीची बळी ठरलेली आहे. असे म्हटंल्यास फारसे वावगे होणार नाही. कारण अर्जुनसारख्या दलित युवकाच्या कर्तृत्वावर तिचा विश्वास असूनदेखील केवळ आपल्या कुटुंबाच्या इज्जतीसाठी तिला आपल्या प्रेमाचा बळी द्यावा लागतो. सोनलचे वर्णन दत्ता भगत 'फुलपंखी वादळ' असं करतात. सोनल व अर्जुनच्या प्रेमाचा अंकुर अशा दलित -दलितेत्तर संघर्षात होरपळून जातो. याबाबत प्रा.शैलेश त्रिभुवन

म्हणतात की, "जातीयता तोडण्यापेक्षा या आंतरजातीय विवाहामुळे नंतर आपल्या कुटुंबांना अनेक समस्यांना तोंड देऊन कुटुंब उध्वस्त होण्याच्या भीतीने सोनल आपल्या विवाहाचा निर्णय बदलते. यातून आंतरजातीय विवाहाचा प्रश्न अजूनही नीटपणे समजून घ्यायला तयार नाहीत असेच दत्ता भगत यांना सुचवायचे आहे."[३] यातून परंपराधिष्ठित समाजाची मानसिकता यापुढे जाऊन सोनल निर्णय घेवू शकत नाही. आंतरजातीय विवाहांनी आपल्या कुटुंबाला समाजाकडून त्रास होईल हा तिचा विचार समाजातील जातीयता पाहता, सवर्ण दलित संघर्ष पाहता योग्य वाटतो. मात्र ती या दबावाखाली जीवनात मोठी तडजोड करून जाते. सोनलच्या माध्यमातून दत्ता भगत यांनी मानवावर असणाऱ्या जातीयतेचे व समाजाचे वर्चस्व स्पष्ट केले आहे.

**२.३ नाटकातील घटनाप्रसंग :**

कथानकात घटना आणि प्रसंगांना अतिशय महत्त्व असते. घटना प्रसंगाच्या माध्यमातून आशयाला आकार येत असतो. माणूसकी भोवती फिरणाऱ्या आणि पर्यायाने जीवनमूल्यांचा ऱ्हास होत असल्याचे चित्रण येथे घडते यामधूनच घटना घडत जातात व घटनेतून नाटक आकार घेत जाते.

वाटा पळवाटा मध्ये घटना रंगभूमीच्या बाहेर घडतात आणि तिचे पडसाद रंगभूमीवर उमटतात. दंगलीची घटना अशाच प्रकारे पडसादामधूनच घडते. त्याच प्रमाणे कॉलेजचे वातावरण देखील याच पध्दतीने उभे केले जाते.

काका दासराव भेटीचा प्रसंग आहे. दासराव म्हणतात,नमस्कार काका तेव्हा काका म्हणतात "जयभीम आमचा आपला जयभीमच हं"(पृ.क्र.८) या प्रसंगातून काकांचा जातीविषयी असणारा अभिमान दिसून येतो. दासरावाचे, "काका आता चहा कोणाच्याही संगतीत घेतला तरी काय बिघडतं? आणि चहा तर हेमाताईच करणार आहेत ना?" दासरावांची जातीय आणि परंपरा जीवनवादी वृत्ती या प्रसंगातून दिसून येते. काका हेमा बद्दल स्पष्ट म्हणतात एखादी आमच्या जातीची मुलगी सतीशने करून आणली असती तर सुखात लोळली असती. "आम्ही मोप इसरतो म्हंतो जात पण लोक इसरंतात का गुरूजी? तुम्ही हेमाला मानली आपली लेक मंजूर परीक शेवन्ता? शेवंताला मानता का आपली लेक?" (पृ.क्र.१०) प्रत्येकाला आपली जात प्रिय असते हेच काकांच्या संवादातून दिसून येते.

अर्जुन पुरग्रस्तांची घरे दलितांना मिळवून देतो त्यांच्याकडून पन्नास रूपये प्रमाणे वर्गणी गोळा करतो. शेवन्ता ही विधवा स्त्री वर्गणी देत नाही तेव्हा तिचे साहित्य घराबाहेर काढतो. मिलिंदनगर मध्ये झालेल्या गोळीबारात शेवन्ता मरण पावते. पन्नास

रूपयांसाठी तिचा जीव जातो. सरकारी अधिकाऱ्याला खूश करण्यासाठी पैसे उभे केले जातात हे या प्रसंगातून दिसून येते. पूरग्रस्तांच्या घराच्या प्रश्नावरून निघालेल्या मोर्चावर गोळीबार होतो तेव्हा सवर्ण मंडळी दलितांची घरे जाळतात. उध्वस्त झालेल्या दलितांना शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी अर्जुन बेभान होतो. मंञ्याच्या हस्ते मदतीचे वाटप दलितांना करतो. मंञ्याने अर्जुनची स्तुती केली त्यामुळे तो स्वत:ला धन्य मानू लागला आहे. यातून अर्जुन चळवळीपासून राजकारणाकडे झुकलेला आहे हे दिसून येते. इथे आंबेडकरी विचाराची पडझड झालेली दिसून येते.

प्रा. सतीश आणि अर्जुन या दोघातील परस्परसंबंधातून त्यांच्या स्वभावावर प्रकाश पडतो व त्यांचे विचार समजतात. अर्जुन स्वत:ला चळवळीत झोकून देणारा अडाणी दलित लोकांच्या अडचणी समजून घेणारा आहे म्हणूनच तो मोर्चा काढतो मात्र त्याचे पर्यवसन दलित वस्ती पेटण्यात होते म्हणूनच सतीश अर्जुनला दोष देतो.

या घडलेल्या प्रसंगाबद्दल अर्जुन म्हणतो, "चार भिंतीच्या घरात राहून बोलणं सोप असतं, सर वर्षानुवर्षे गळक्या झोपडीत रहावं लागतं तेव्हा विवेक आणि विचार डोक्यावर छप्पर धरत नाहीत. आमच्याकरता म्हणून बांधलेल्या घरात आमच्याच देखत जर दासराव जोशांसारखे लोक राजरोसपणे रहाणार असतील तर ते कसं चालेल आम्हांला! तुम्हाला चालेल? भाड्याचं घरसुध्दा दयायचं नाकारलं या गृहस्थानं तुम्हाला. हरामखोर साला हे म्हणजे त्याचं ते त्याचं आणि आमचं तेही त्याचच? मग आमचं काय आहे सर इथं? काय आहे? आमची स्वत:ची एकच गोष्ट आहे सर. वेदना अत्याचार आणि अन्याय यांच्या ओझ्याखाली आम्ही नष्ट नामशेष व्हायची पाळी आली तरी आम्हीच विचार करायचा? जमणार नाही तर! हा संघर्ष नाही, ही चळवळ नाही हे युध्द आहे सर. महायुध्दापेक्षा मोठं! आणि युध्दात सगळ क्षम्य असत! विजयाकडे नेतो तो मार्ग खरा." (पृ. क्र. ४६,४७) या प्रसंगातूनच अर्जुनच्या क्रांतीवादी विचाराचा धागा स्पष्टपणे दिसून येतो.

सतीश अर्जुनच्या घरपट्टी जमा करण्यावर रागवतो. अर्जुन घरपट्टी जमा करणे व शेवंताला घरातून बाहेर काढणे ही घटना पडद्यामागे घडते. त्याच्यावर अर्जुन व सतीशच्या बोलण्यातून संवादातून प्रतिक्रिया उमटताना दिसतात. पन्नास रूपयाअभावी शेवन्ता मोर्चात सामिल होवू शकत नाही पर्यायाने ती एकटी पडते व सवर्ण तीला जिवंत जाळतात. या सर्व घटनांचे कारण अर्जुन ठरतो. यावर अर्जुन सतीशला 'चळवळीत उतरायचं तर किंमत मोजावी लागते' (पृ. क्र. ७२) हे सांगुन सतीशचं किंमत मोजनं म्हणजे नोकरी आणि प्रतिष्ठा संभाळत बदनामीला तोंड देणे तेही फक्त चर्चा

करून, हे तत्त्व ही सतीशची सतीशलाच ओळख अर्जुन करून देतो. हा नाटकातील प्रसंग उठावदार झाला आहे यातून दलित समाजातील उच्चशिक्षित दलित समाजापासून दूर जाणाऱ्या मानसिकतेवर ताशेरे ओढले आहेत.

अर्जुनच्या बोलण्याने सतीशला पश्चाताप होतो. तो हेमाला म्हणतो, "खरं आहे हेमा त्याचं, किंमत मोजावी लागते. हेमा किंमत मोजावी लागते. हे मलासुध्दा माहिती आहे. माझी त्याला तयारीसुध्दा आहे. मी फक्त विचारच करीत राहिलो. वांझं विचार, निरोपयोगी ठरलोय मी ह्या व्यवस्थेत काहीच करू शकत नाही मी, मला धड अतिरेकी होता येत नाही आणि धड किड्यासारखं जगताही येत नाही हेमा माणसातल्या चांगुलपणावरचा विश्वासच उडत चाललाय माझा!"(पृ.क्र.७२-७३) अशा तऱ्हेने दलित चळवळीच्या निमित्ताने नाटकातील घटना प्रसंग घडतात. या प्रसंगात हेमा व सतीश यांचा आंतरजातीय विवाह असूनही ते एकमेकाशी माणूसकीचा व्यवहार करतात. काकांच्या बोलण्याने, दासरावांच्या वागण्याने हेमाला त्रास होतो. मात्र ती सतीशसाठी सर्व स्विकारताना दिसते. दलित चळवळीबरोबर आंतरजातीय विवाहाची समस्याही घटना प्रसंगातून उठून दिसते.

## २.४. नाटकातील संघर्ष :

'वाटा पळवाटा' नाटकात संघर्षाच्या केंद्रस्थानी चळवळ व जातीयता हे दोन घटक आहेत. चुकीच्या मार्गामुळे आणि मार्गदर्शनाअभावी चळवळीची कशी पडझड होते याचे चित्रण या नाटकात घडते.

आंतरजातीय विवाहामुळे हेमाला स्वत:शीच संघर्ष करावा लागतो आहे. काकांची उठता बसता तिच्या ब्राह्मण असण्याचा केलेला उध्दार तिला सहन करावा लागतो. सोनल तिच्या मदतीची अपेक्षा करून येते ते केवळ हेमाने आंतरजातीय विवाह केला आहे.दासराव गुरूजींच्या दुटप्पी वागण्याने तिला त्रास होतो. जो तो तिला आपल्या जातीच्या अधारे ओरबाडतो म्हणूनच ती म्हणते, "महार म्हटलं तर शिवी ठरते आणि ब्राम्हण म्हटलं तर? तर काय तो माझा गौरव होतो?"(पृ.क्र.४८) दासराव गुरूजी तिला आपल्या वाड्यात राहायला जागा देत नाहीत त्यामुळे हेमाला ब्राह्मणही स्वीकारत नाहीत व बौध्दही स्वीकारत नाहीत या दोन्ही जातीमध्ये तिची होणारी कुचंबना व्यक्त झाली आहे.

'वाटा पळवाटा' च्या मुळाशी चळवळ व जातीयता यातील संघर्ष महत्त्वाचा आहे. काकांच्या पिढीतील चळवळ सतीशच्या पिढीत स्थिरावल्या सारखी वाटते. तर अर्जुन च्या पिढीत ती उद्रेकी स्वरूप धारण करते. अर्जुन या चळवळीचे

नेतृत्व करणारा आहे. अर्जुन तसा वंडखोर चळवळीसाठी वैयक्तिक जीवनाचा त्याग करतो. पण त्यावेळी पुरेशा मार्गदर्शनाच्या अभावी तो राजकीय खेळातील बाहुले बनु लागतो. यामुळे चळवळ मोडकळीस येते. तिला राजकीय स्वरूप येवू लागते व पुढारी मंडळी तिचा सोयीनुसार उपयोग करू लागतात.

यातील खरा संघर्ष सतीशचा स्वत:च्या जगण्यातील आहे. त्याचा स्वत:च स्वत:शी संघर्ष चालू आहे. त्याला चळवळीत भागही घेता येत नाही व त्यापासून दूरही राहता येत नाही. म्हणूनच रामदास कांबळे यांनी दत्ता भगत यांच्या एकांकिका, नाटकाव्दारे "दलित रंगभूमीचे नाटक आत्मपरिक्षण करीत आहे. स्वत:च्या भविष्यकाळाचे चिंतन करीत आहे. स्वत:चा स्वत:शीच संघर्ष अभिव्यक्त करताना कित्येक सार्वत्रिक सत्यानाही हात घालतात एकवेळ दुसऱ्याविरूध्द पुकारलेला लढा समजू शकतो. पण स्वत:विरूध्द लढा अतिशय अवघड असतो"[४] असे नमूद केले आहे. यातून दत्ता भगत यांच्या नाटकातील स्वत:चा शोध घेण्यासाठी केलेला संघर्ष आहे. हाच संघर्ष या नाटकातील सतीशचा संघर्ष आहे.

अर्जुन चुकीच्या दिशेने चालला आहे हे सतीश जाणून आहे त्याची ही व्यथा हेमाशी बोलताना व्यक्त होते, "म्हणूनच तर उदास झालोय परिस्थितीला आवर घालणारे राजकारणी संपले. आता परिस्थितीवर स्वार होतो तो नेता ठरतोय. आज प्रलोभनाची खिरापत वाटतो त्याच्या मागे जातात लोक. तुला काय वाटतं? आज अर्जुनच्या पाठीशी उभे असणारे दलित उद्या त्याच्या पाठीशी उभे राहतील? अर्जुननं घरं मिळवून दिली त्यांना विनासायास. उद्या अर्जुनपेक्षा मोठं प्रलोभन देऊ करणारा कुणी पुढं आला की लोक त्याला फेकून देतील. अर्जुनचं स्थान काय उरेल माहितय? एक तर तो फ्रस्ट्रेट होईल नाहीतर राजकारणातल्या एखाद्या बड्या दादाचं बाहुलं होईल आणि दलितांच्या संघटनेच्या होतील चिंध्या प्रलोभनाच्या मोहक शस्त्रानं उडवलेल्या!" मोहाला, राजकीय सत्तेला बळी पडून दलित चळवळीतील तरूण राजकारण्यांच्या हातचं बाहुलं बनेल. दलित संघटना मोडीत निघेल. याची भीती दत्ता भगत यातून व्यक्त करतात.

एकूणच चळवळ आणि तिची पडझड यामधून उद्ध्वस्त होणारे संसार यातील संघर्षाचे आणि द्वंद्वाचे चित्रण प्रस्तुत नाटकात आलेले दिसते. अर्जुनने सोनलचा त्याग करणे, हे दलित दलित्तेतरांमधील संघर्षाचे कारण आहे. येथे प्रत्येकाचा स्वत:शी, समाज व्यवस्थेशी, जातीयतेशी आणि मानवी मुल्यांशी संघर्ष चालू आहे.

२.५. **वाङ्मयीन मूल्यमापन :**

१. 'वाटा पळवाटा' हे नाटक दोन अंकी असून त्यात एकूण सहा प्रवेश आहेत. अंक प्रवेशाची मांडणी परिणामकारक झाली आहे. त्यांच्या नाटकाची रचना कुठेही बटवटीत आणि ढिसाळ झालेली दिसत नाही. नाटकाची बांधणी बांधेसूद, परिणामकारक, सुसंघटीत अशा प्रकारची झालेली आहे.

२. नाटकाच्या रचनेचा विचार करीत असताना त्यांच्या अंक, प्रवेश यांच्या विशिष्ट मांडणीमुळे नाटक प्रभावी झालेली आहेत. त्याचबरोबर नाटकाच्या प्रयोगाच्या संदर्भात त्यांनी दिलेल्या सूचना महत्त्वपूर्ण असल्यामुळे नाटकाची एकूणच रचना दलित रंगभूमीला योगदान देणारी ठरली आहे.

उदा. प्रयोगा संदर्भातील सूचना : "खोलीतला साधेपणा आणि व्यवस्थितपणा चटकन लक्षात यावा. पडदा सरकतो. वेळ सायंकाळची. काका वय पंचावन्न ते साठ. खुर्चीत बसून प्रयत्नपूर्वक पेपर वाचताहेत."

३. 'वाटा पळवाटा' या नाटकात दत्ता भगत यांनी दलित प्रश्नांचा प्रभावी अविष्कार घडवून आणला आहे. दलित दलितेतर संघर्ष व दलितांमधील संघर्षाचे चित्रणही या नाटकात येते. दलित चळवळीची आजची पडझड तत्कालीन जीवनातील दलित संघर्ष, त्याचे जगणे, जीवनमुल्यांची पडझड इ. गोष्टींमुळे त्यांच्या नाटकाला वेगळेपण प्राप्त झाले आहे.

उदा. पुरग्रस्तांची घरे दलितांना द्यावी म्हणून अर्जुन व सवर्ण यांच्यात होणारा संघर्ष, शेवंता व अर्जुन यांच्यातील घरपट्टीबाबत झालेला संघर्ष तसेच काका-सतीश-अर्जुन या दलित वर्गातील व्यक्तींचा वैचारिक संघर्ष.

४. दत्ता भगत यांनी नाटकात वेगवेगळया प्रवृत्तीच्या व्यक्ती निर्माण केल्या आहेत. काका, सतीश, अर्जुन या व्यक्ती आपापल्या पिढीचे प्रतिनिधित्व करतात. प्रा. सतीशची तडजोडीवृत्ती, हेमाची समर्पणवृत्ती, अर्जुनचा अतिरेकीपणा, दासरावाचा कावेबाजपणा ही सर्व पात्रे आपापल्या स्वभावानिशी नाटकात वावरताना दिसतात. या व्यक्तिरेखा समाजजीवनात दिसू शकतील अशा आहेत यामुळे नाटकाची गुणवत्ता वाढलेली दिसते.

५. संवादाच्या अंगाने दत्ता भगताच्या 'वाटा पळवाटा' नाटकाचा अभ्यास करताना काकाची हतबलतेची भाषा, प्रा. सतीशची तडजोडीची व पुस्तकी, प्राध्यापकी भाषा उठून दिसते. संवाद निर्माण करताना भगतांनी अनेक वारकाव्याचा अभ्यास केलेला दिसून येतो. या दृष्टीने हेमा व सतीश, काका व सतीश, अर्जुन व सतीश

यांच्यातील संवाद पाहण्यासारखे आहेत. या संवादातून त्या त्या प्रसंगाचे गांभिर्य, ताण-तणाव बारकाईने चित्रित होताना दिसतात. संवादातून नाटककाराला पात्रांचे व्यक्तिमत्त्व उभे करावे लागते ही व्यक्तिमत्त्वे उभी करण्यात भगतांना यश आले आहे.

६. नाटकाची एकूणच परिणामकारकता वाढविण्यासाठी पात्रागणिक त्याची शैली बदललेली दिसते. नाटकात काही प्रसंगी कठोर बनणारी शैली काकांच्या मृत्यूनंतर मृदू बनते. हिच शैली अर्जुनच्या संदर्भात विद्रोही बनताना दिसते. कुठेही पाल्हाळीक न बनणारी भगतांची शैली सतीश गोडघाटेच्या संवादातून समजूतदार बनली आहे तर दासरावांच्या संदर्भात कावेबाज बनते.

७. संवादाबरोबर भाषेचाही त्यांनी चांगल्या पध्दतीने वापर केलेला आहे. काकांची ग्रामीण भाषा, सतीशची तत्कालीन सुशिक्षित दलित पिढीचे प्रतिनिधित्व करणारी भाषा, अर्जुनची बंडखोरी भाषा अशी पात्रागणिक बदलत्या भाषेमुळे नाटकाला अपरिहार्यपणे अनेक आयाम प्राप्त झालेले दिसून येतात. एकूण पात्रांच्या बारकाव्यानिशी भाषा व संवाद नाटकामध्ये आवतरतात त्यामुळे नाटक परिणामकारक ठरले आहे.

८. नाटकाच्या प्रायोगिकतेच्या अंगाने विचार करताना दत्ता भगत नाटकाचे प्रयोगमुल्य समोर ठेवून नाटक लिहताना दिसतात. 'वाटा पळवाटा' मधील पुर्ण नाटक हे प्रामुख्याने सतीशच्या घरात घडते सर्व घटना पडद्याच्या पाठीमागे घडतात आणि त्याचे पडसाद सतीशच्या घरात उमटतात. त्यामुळे रंगमंचावर फारसे बदल करावे लागत नाहीत. मात्र दत्ता भगत यांनी त्याच्या 'आवर्त' या एकांकिकामध्ये लोककलाच्या आकृतीबंधाचा उपयोग करून जे वेगळे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता त्याचा थोडाही अंश वाटा पळवाटांच्या प्रायोगिक घटकात दिसून येत नाही.

'वाटा पळवाटा' नाटकाचा वाङ्मयीन विचार करताना नाटकाची रचना, संवादाची वैशिष्टये, व्यक्तिरेखा, प्रयोग याचा विचार केला आहे.

## ३. निष्कर्ष :

१. साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास या अभ्यासक्षेत्रा-अंतर्गत दत्ता भगत यांच्या 'वाटा पळवाटा' नाटकाचा विचार करता दत्ता भगत यांच्यासमोर समाजातील दलित आणि ब्राह्मण यांच्या संबधातील प्रकाश टाकण्याचा हेतू असावा असे दिसते. दलित आणि दलित्तेतर संबंध हे कितीही टाळायचे म्हटले तरी टाळता

येत नाहीत, अशी एक बाजू असली तरी दुसऱ्या बाजूने माणुसकीचा घात करणारी जात देखिल आड येऊ शकत नाही. तिच्यावर मात करून माणूस यशस्वी होतो त्याचे चित्र हेमा व सतीश यांच्या संबंधातून घडते. मानसाने माणसाकडे माणुसकीच्या दृष्टीनेच पहावे असा विचार दत्ता भगत यांनी मांडलेला आहे.

२. दत्ता भगत यांनी नाटकात दासराव ही पारंपरिक विचार करणारी व्यक्तिरेखा निर्माण करून सुधारकी वेशाच्या आड जातीयता आणि परंपरावादी जीवनवृत्ती जोपासली जाते हे दाखवून दिले. हिच परंपरावादी जीवनवृत्ती आंतरजातीय विवाहाला मान्यता देत नाही, समाजात प्रतिष्ठा देत नाही हे स्पष्ट केले आहे.

३. 'वाटा पळवाटा' नाटकाच्या माध्यमातून दत्ता भगत यांनी समाजात जातीला असणारे महत्त्व स्पष्ट करून माणसाची जातीशिवाय पूर्ण ओळखच होत नाही हे सामाजिक वास्तव मान्य करून परखड मांडणी केली आहे. प्रत्येकालाच आपली जात प्रिय असते हे काका, दासराव, अर्जुन अशा व्यक्तिरेखेच्या माध्यमातून दाखवून दिले आहे. समाजातील जातीयतेमुळेच मानवी भावनेची कुचंबना होते हे अर्जुन व सोनल यांच्या माध्यमातून दाखविले आहे. जातीयतेमुळे व पारंपरिक विचार पध्दतीमुळेच आंतरजातीय विवाहाला विरोध होताना दिसून येतो.

४. 'आंतरजातीय विवाहाची समस्या' या दृष्टीने या नाटकाचा विचार करता माणसाच्या मनातील जातीयता व परंपरावादी दृष्टी समोर येते. तसेच आंतरजातीय विवाहाबद्दल सुशिक्षित लोकांचाही दृष्टिकोन फारसा बदलेला नाही हे नाटकातील वास्तव, जिवंत व्यक्तिरेखातून स्पष्ट होते. सामाजिक स्तरावर या विवाहाला प्रतिष्ठा दिली जात नाही हे सामाजिक वास्तव नाटकातून मांडले आहे.

५. 'वाटा पळवाटा' या नाटकातील आंतरजातीय विवाहाच्या समस्येच्या विचार करताना नाटककाराची भूमिका दलितातील पांढरपेशी प्रवृत्तीचे समर्थन करणारी असणारी प्रत्ययास येते.

उदा. दत्ता भगत यांनी नाट्यलेखनाला प्रारंभ केला त्यावेळी औरंगाबाद येथील दलित थिएटर व पुणे येथील दलितरंगभूमी या दोन नाट्य संस्था विशेष लोकाभिमूख झाल्या होत्या. मात्र दत्ता भगतचे सदर नाटक प्रस्थापित नट आणि नाट्यसंस्थेने सादर केले.

**संदर्भ :**


| | | |
|---|---|---|
| १.प्रा.त्रिभुवन शैलेश | - | 'दत्ता भगत यांची नाटके', पॉपिलॉन पब्लिशिंग हाऊस, पुणे पब्लिशिंग. २००१ पृ.क्र. ७२ |
| २. प्रा.महेंद्र भवरे | - | "जातक दत्ता भगत यांची नाटके : संहिता लोकन आणि अन्वयार्थ", संपा.डॉ.लुलेकर प्रल्हाद, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद. प्रथमावृत्ती पृ.क्र.२६४ |
| ३.तत्रैव | - | पृ.क्र. ७२ |
| ४.कांवळे रामदास | - | "दलित नाटक : दलित रंगभूमी", 'अस्मितादर्श' दिवाळी अंक, १९८५. पृ.क्र.- २१२ |